RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On : 12 June 2016 :: Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 14 June, 2016

अजायब ✵ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : तेरा | अंक : बारावा | जून २०१६



आंतरिक प्रगती गुप्त ठेवा (संदेश) 5

सत संगत जग सार साधो (सत्संग) 9

गुरूंप्रती खरे समर्पण (प्रश्नोत्तर) 21

धन्य अजायब (सत्संगाच्या कार्यक्रमाची माहीती) 34

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.



आंतरिक प्रगती गुप्त ठेवा

परमसंत अजायब सिंहजी महाराजांनी प्रेमींना ध्यान-अभ्यासात बसविण्यापूर्वी दिलेला एक महत्वपूर्ण संदेश

परमात्म्याने आपणांस मनुष्यजन्म दिलेला आहे. या मनुष्यजन्माचे फायदे असे आहेत की जी कामे आपण पशु-पक्ष्यांच्या जन्मात करू शकत नाही, ती सर्व कामे आपण मनुष्य जन्मात करू शकतो. ती कामे म्हणजे परमात्म्याची भक्ती व परमात्म्यावर प्रेम. आपल्या आत्म्यास स्वत:च्या राजघराण्याचा विसर पडलेला आहे. सतवंशामध्ये आपला आत्मा परमात्म्याचा पुत्र होता. परंतु परमात्म्यास विसरून त्याने मनाशी मैत्री केल्याने तो पापांच्या ओझ्याखाली दबून गेला आहे. जस-जसा आपला आत्मा परमात्म्यापासून दुरावत गेला, तस-तसा त्याच्यावर स्थूल, सूक्ष्म आणि कारण अशा तीन पडद्यांची आवरणे त्याच्यावर चढत गेली. आता तर यास याची देखील कल्पना नाही की याचे स्वत:चे घर कोणते आहे? आत्म्यांना पापांच्या ओझ्याखाली दबलेले पाहून परमात्मा संत स्वरूप धारण करून या जगामध्ये आला आणि स्वत:ची माहिती त्याने सर्वांना दिली. स्वामीजी महाराज सांगतात:

सन्तरूप होए जग में आया, अपना भेद आप उस गाया।

जगाशी असलेला आपला मोह सोडविण्यासाठी संत-सतगुरू आपणांस मदत करतात. उष्ण हवामानाच्या उकाड्यापासून स्वत:चा बचाव करण्यासाठी जसे आपण पर्वता निकट जातो तेव्हा आपणांस शीतल हवामान अनुभुत होऊ लागते, तसेच ज्यांनी स्वत:ची अध्यात्मिक उन्नती करून घेतली त्यांनी संतांवर प्रेम करूनच ती प्राप्त केली. संत आपल्या प्रेमाचे भूकेलेले नसतात. ते तर स्वत:च त्यांच्या गुरूंच्या प्रेमात निमग्न असतात. सतगुरूंवर प्रेम करूनच आपण या जगाप्रती असलेला आपला मोह त्यागू शकतो.

मला हे पाहून आनंद होत आहे की तुम्ही काही दिवसांसाठी आप-आपल्या घरांचे बंधन आणि जबाबदाऱ्या दूर ठेवून परमात्म्याच्या स्मरणार्थ

एकत्रित झाला आहात. मी आशा करतो की जे ध्येय साध्य करण्यासाठी तुम्ही येथे एकत्र आलेला आहात, ते ध्येय गाठण्याचाच तुम्ही विचार कराल. संत आपणांस ते नामस्मरण देतात, त्या नामस्मरणामागे त्यांचे तप–त्याग आणि चार्जिंग कार्यरत असते. ते आपणांस कोणाकडून तरी ऐकलेले वा पुस्तकांमधून वाचलेले नामस्मरण देत नाहीत. त्यांनी स्वत: जो प्रयत्नपूर्वक अनुभव घेतलेला असतो, त्याबद्दलच ते आपणांस सांगतात.

आपण जेव्हा सातत्याने नामस्मरण करतो, जगामध्ये पसरलेले आपले लक्ष आपल्या नेत्रांमागे एकाग्र करतो आणि तीसऱ्या तिळावर पोहोचून संतांचे स्मरण करतो तेव्हा आपला आत्मा स्थिरावू लागतो. जेव्हा सेवकास स्वत:च्या शरीराचा विसर पडतो तेव्हा सतगुरू आणि सेवक एकरूप होतात. आपण नामस्मरणाद्वारेच सतगुरू–स्वरूपापर्यंत पोहोचू शकतो.

अभ्यासी जेव्हा स्वत:स विसरून अखंड नामस्मरण करतो, तेव्हा त्यास केवळ सतगुरूंचेच स्मरण असते. मग सूर्य–चंद्र–तारे सर्व पार केल्यावर पुढे सतगुरू स्वरूप प्रकट होते. तेथे जाऊनच तो खरा शिष्य बनतो. त्यापुढे सेवकाची जबाबदारी संपते. सतगुरू शब्दाच्या मदतीने एकानंतर दुसरे अशी मंडळे पार करवितात. येथे पोहोचलेल्या शिष्यास ते म्हणतात, ''तू शब्दरूपी रस्सी पकड.'' शब्दावर स्वार होऊनच आत्म्याने ही मंडळे पार करावयाची असतात. येथे पोहोचल्यावर शिष्याच्या अंतरात सतगुरूंप्रती खरे प्रेम जागृत होते कारण ते शिष्यासाठी काय करतात ते तो स्वत:च्या नेत्रांनी पाहतो.

सतगुरू त्यांच्या कृपेने शिष्यास एका मंडळातून दुसऱ्या मंडळात नेतात. येथे पोहोचलेला आत्मा त्यास होत असलेल्या आनंदाचे वर्णन करू शकत नाही. त्याने इतरांपुढे वर्णन करण्याचा प्रयत्न केल्यास त्याची प्रगती खुंटून जाते. ज्याप्रमाणे एखादी स्त्री स्वत:चे शरीर वस्त्रांनी झाकते, त्याचप्रमाणे येथे पोहोचलेल्या आत्म्याने त्याच्या अध्यात्मिक प्रगतीस लपवून ठेवावे.

राजस्थान येथे सप्टेंबर महिन्यात ग्रुपसाठी दहा दिवसांचा कार्यक्रम आयोजित केला गेला होता. या कार्यक्रमात एका आत्म्याने ध्यान–अभ्यासामध्ये

खूप प्रगती केली. जेव्हा अंतरामध्ये सतगुरू स्वरूपाचे दर्शन झाले तेव्हा त्यास खूप आनंद झाला. ते सर्व त्याने त्याच्या गटप्रमुखास सांगितले.

ज्यास काही द्यायचे असेल अशा व्यक्तीसच सतगुरू गटप्रमुख बनवितात. परंतु अनेक गटप्रमुख आळशीपणा करतात, मान-मोठेपणाच्या आहारी जाऊन ध्यान-अभ्यास करीत नाहीत. त्या गटप्रमुखाच्या अंतरात द्वेश निर्माण झाला की मी तर याने नाम घेण्याच्या अनेक वर्षांपूर्वी नाम घेतले होते, माझ्या नंतर नाम घेऊनही याने इतकी प्रगती केली? त्या बिचाऱ्याची अध्यात्मिक प्रगती खुंटली. माझ्याकडे येऊन त्याने पश्चाताप व्यक्त केला.

महाराज सावन सिंहजींच्या एका नामधारक शिष्येने ध्यान-अभ्यासात खूप प्रगती केली. तिने देखील अशाच प्रकारे आपला आंतरिक अनुभव कोणालातरी सांगितला, त्यामुळे तिला आंतरिक अनुभव होणे बंद झाले. महाराज सावन सिंहजींच्या समोर उभी राहून ती रडू लागली व म्हणाली की जे काही मला प्राप्त झाले होते, ते सर्व दिसेनासे झाले आहे. महाराज सावन सिंहजी म्हणाले, ''तू जर विद्रूप मनुष्यास आरसा दाखवलास तर तो नक्कीच आरसा तोडून टाकेल. तुला आता मेहनत करावी लागेल. यापुढे कोणास सांगू नकोस.'' आपण आपली **आंतरिक प्रगती गुप्त ठेवावी**. जेव्हा आपण तीसऱ्या तिळावर एकाग्र होतो, तेव्हा ज्या वस्तूच्या आपण शोधात असतो, ज्यावस्तूसाठी आपण ध्यानात बसतो ती वस्तू आपणांस अंतरातूनच मिळते.

मनास शांत करा. आपल्या अंतरात निर्माण होत असलेल्या सांसारिक संकल्प-विकल्पांना विसरून शांत मनाने ध्यान-अभ्यासासाठी बसा. शांत मनच ध्यान-अभ्यास करू शकते. ध्यान-अभ्यासास ओझे न समजता तो प्रेमाने करा. बाहेरील आवाजाकडे लक्ष देऊ नका, कारण प्रत्येकजण आप-आपल्या कामात मग्न आहे. मनास बाहेर भटकू न देता, त्यास तीसऱ्या तिळावर एकाग्र करा. बंधुंनो! बसा, ध्यान-अभ्यास करा.

***



सत संगत जग सार साधो

सत्संग : परमसंत अजायब सिंहजी महाराज, कबीर साहेबांची वाणी
कोलंबिया – १२ जून १९९५

परमपिता परमात्मा सावन–कृपालजींच्या चरणी नमस्कार असो ज्यांनी आपणांस त्यांचे गुणगान करण्याची तसेच त्यांच्या स्मरणात बसण्याची संधी दिली. काल गुरू नानकदेवजी महाराजांच्या वाणीवर सत्संग झाला होता, ज्यामध्ये त्यांनी आपणांस अत्यंत सखोलतेने समजावले होते की परमात्मा आपल्या शरीरामध्ये आहे. सच्चखंडातून 'शब्द' आपल्या मस्तकामागे गुंजत आहे. जे आपणांस परमात्म्याच्या धामास पोहोचण्याचा मार्ग दर्शवितात तेच पूर्ण संत आहेत, तेच खरे सतगुरू आहेत.

संत–महात्म्यांच्या वाणींमध्ये सत्संग, नाम आणि गुरू–महिमेचे वर्णन केलेले असते. नामाशिवाय आपली मुक्ती होऊ शकत नाही व सत्संगाशिवाय आपणांस याचे आकलन होऊ शकत नाही. आपल्या मनावर आपण केलेल्या संगतीचा खूप खोलवर परिणाम होत असतो. आज तुमच्या समोर कबीर साहेबांच्या दोन लहान–लहान वाण्या सादर केल्या जात आहेत.

संत–महात्मा जेव्हा एखाद्या विषयाबद्दल समजावतात तेव्हा ते काहीच कसर बाकी ठेवत नाहीत, सुरुवातीपासून शेवटपर्यंत सर्व काही समजावून सांगतात. कबीर साहेबांनी पहिल्या वाणीत सत्संगाच्या महिमेचे वर्णन केलेले आहे व दुसऱ्या वाणीत ते अशा लोकांविषयी समजावतात जे नाम घेऊनही त्यास विसरतात व नाम मार्गावर न चालून ते किती मोठी चूक करीत आहेत.

सत संगत जग सार साधो, सत संगत जग सार रे, (२)

१. काशी नहाऐ, मथुरा नहाऐ, नहाऐ हरिद्वार रे, (२)
चार धाम तीर्थ फिर आऐ, मन का नहीं सुधारे रे,
सत संगत जग...

२. वन में जाए कियो तप भारी, काया कष्ट अपार रे, (२)
इन्द्री जीत करे वस अपने, हृदय नहीं विचार रे,
सत संगत जग...

३. मंदिर जाऐ करे नित पूजा, राखे बड़ो अचार रे (२)
साधु जन की कदर ना जाने, मिले ना सिरजनहार रे,
सत संगत जग...

४. बिन सतसंग ज्ञान नहीं उपजे, कर ले यत्न हजार रे, (२)
'ब्रह्मानंद' खोज गुरु पूरा, उतरो भवजल पार रे,
सत संगत जग...

संत–महात्म्यांनी सत्संग ऐकण्यास खूप महत्व दिलेले आहे. दयाळु महाराज कृपालजींनी मला अत्यंत प्रेमाने सांगितले होते, ''मुला! शरीर जरी कमजोर झाले असले, शरीराने बिछाना जरी धरला असला तरी एका कुशीवरून दुसरी कुशी बदलता येत असेपर्यंत तू सत्संगास जाणे सोडू नकोस. मग भलेही त्यासाठी इतरांची तुला मदत घेण्याची गरज पडो.''

हिंदुस्थानमध्ये तीर्थस्थानावर स्नान केल्याने मुक्ती प्राप्त होते असा सर्वसाधारण लोकांचा समज आहे. ब्रह्मानंदजी प्रेमाने समजावतात, ''तुम्ही भले काशीला जाऊन स्नान करा वा हरिद्वारला जाऊन स्नान करा किंवा हिंदू लोकांच्या मान्यतेनुसार चारही धामांची परिक्रमा करा, तरीही तुमचे मन तुमच्या काबूत येणार नाही, मनास शांती लाभणार नाही किंबहुना तसे केल्याने अहंकार निर्माण होतो की मी इतक्या तीर्थयात्रा केल्या आहेत.''

ब्रह्मानंदजी सांगतात, ''तप–साधना करण्यात ऋषी–मुनींनी कोणतीही कसर बाकी ठेवली नव्हती. ते जंगलामध्ये गेले, शारीरिक त्रास त्यांनी सहन केले, तप केले. इंद्रियांना तात्पुरते वश करून त्यांचा वाटले की मी आता पूर्ण–योगी झालो आहे. परंतु त्यांचे मन ना शांत झाले, ना त्यांच्या हृदयात विचार आला की हे मन कधीही आपला घात करू शकते.''

श्रुंगी ऋषी अतिशय प्रसिद्ध ऋषी होऊन गेले आहेत. तुम्ही सर्वांनी त्यांच्या कथा ऐकलेल्या आहेत. ते बालपणीच जंगलामध्ये निघून गेले. त्यांनी चांगले खाणे, अन्नाचा त्याग केला. झाडास एकदा जिव्हेने चाटणे हेच त्यांचे भोजन होते. एकदा राजा दशरथाच्या राज्यामध्ये दुष्काळ पडला. त्यावर उपाय म्हणून ज्योतिषांनी राजा दशरथास सांगितले की श्रुंगी ऋषींनी येऊन यज्ञ केल्यास पर्जन्यवृष्टी होऊ शकेल.

श्रुंगी ऋषीस यज्ञासाठी जंगलामधून राज्यामध्ये घेऊन येण्याचा एका स्त्रीने विडा उचलला. कारण श्रुंगी ऋषी जंगलामधून गाव वा शहरामध्ये कधी येत नसत. ती स्त्री जंगलामध्ये गेली. तिने सर्वप्रथम निरीक्षण केले की श्रुंगी ऋषी काय करतात? काय खातात? तिने पाहिले की ते दिवसातून एकदाच झाडास जिव्हेने चाटतात. तिने त्या जागेवर मध चोपडले. मधाच्या गोडव्याने श्रुंगी ऋषी जेथे एकदाच जिव्हेने चाटत असत, तेथे दोनदा चाटू लागले. नंतर त्या स्त्रीने त्या जागेवर शिरा चोपडण्यास सुरूवात केली. शिरा खाल्ल्याने ऋषींच्या शरीरामध्ये शक्ती आली. तुम्ही जाणताच की शरीर जेव्हा धष्टपुष्ट होते तेव्हा मन चलाखी करू लागते. मन अंतरात कामवासना जागृत करते. कामाने अंतरातून उसळी मारताच जवळच तेथे ती स्त्री होती. तेथे प्रापंचिक भोगांची सुरूवात झाली व अनेक मुले जन्माला आली.

त्या स्त्रीने श्रुंगी ऋषींसमोर विचार मांडला की येथे जंगलात राहून आपण मुलांचे पालन–पोषण करू शकत नाही त्यामुळे आपण शहरात जाऊया. श्रुंगी ऋषी कधी गावात वा शहरामध्ये येत नसत. ते येत असताना त्यांच्या खांद्यावर दोन मुले बसलेली होती व आणखीन एक मुल आणि स्त्री पाठीमागून चालत येत होते. शहरामध्ये पोहोचल्यावर श्रुंगी ऋषींनी यज्ञ केला. कोणीतरी टोमणा मारला की आम्ही असे ऐकले होते की श्रुंगी ऋषी वनामध्ये राहतात, कधीच गावामध्ये येत नाहीत, ते मोठे त्यागी आहेत. हे पहा! यांच्या मागे पुढे तर मुले रडत फिरत आहेत. हे कसले त्यागी? ते ऐकून श्रुंगी ऋषी पुन्हा जंगलामध्ये पळून गेले.

मी नेहमी सांगत असतो की, ऋषी–मुनी वाईट विचारी नसतात. ते खरेतर शूर होते परंतु मनाने त्यांचा घात केला कारण त्यांना परिपूर्ण सतगुरू लाभले नव्हते. त्यामुळे ते बाह्य जगातच साधना करीत राहिले, परिश्रम करीत राहिले. आपण सामाजिक लोकं आपआपल्या धर्म–स्थानांमध्ये म्हणजे मंदिर, गुरूद्वारा, चर्च वा मशिदीमध्ये जात असतो. तेथे आपण परमात्म्याची चर्चा तसेच पवित्र ग्रंथांचे केले जाणारे पठणही ऐकतो. त्याप्रमाणेच आपण प्रार्थना ऐकतो व करतो देखील. त्यामध्ये पूर्ण साधूंच्या संगतीत जाण्यावर जोर दिलेला आहे, परंतु त्यावर आपण दुर्लक्ष करतो. ब्रह्मानंदजी सांगतात:

मंदिर जाऐ करे नित पूजा, राखे बड़ो अचार रे।
साधु जन की कदर ना जाने, मिले ना सिरजनहार रे।।

आपण त्याच कर्मकांडांत गुंतून पडतो. कर्मकांड करून ना कोणाला या पूर्वी परमात्मा भेटला आहे ना यापुढे भेटू शकेल. गुरू अर्जुनदेवजी सांगतात:

कर्म धर्म पाखण्ड जो दीसे तिस जम जोगाती लूटै।
निर्वाण कीर्तन गाओ हर करते का निमख सिमरन जित छूटे।।

ब्रह्मानंदजी सांगत आहेत, ''तुम्ही पूर्ण सतगुरूंचा शोध करा; त्यांच्याद्वारे नाम प्राप्त करून घ्या. तेव्हाच आपण हे भवजल पार करू शकता व आपले जीवन पवित्र बनवू शकता.'' महात्मा आपणांस सांगत आहेत की सत्संगाशिवाय तुम्ही इतर हजारो प्रकारचे जप–तप करून पाहा! तुमच्या अंतरामधील निद्रावस्थेत असलेला आत्मा जागृत होणार नाही, ना अंतरामध्ये प्रकाश दिसेल, ना तुमच्या अंतरात परमपित्या परमात्म्याचा शब्द–ध्वनी ऐकू येईल.

सत्संगाशिवाय आपल्या अंतरात विवेकबुद्धी जागृत होत नाही. विवेकबुद्धी शिवाय सत्य–असत्याचा निर्णय आपण घेऊ शकत नाही. हे सर्व जग नाशिवंत आहे. एवढेच नव्हे तर आपले शरीरदेखील आपली कायम साथ देणार नाही. विवेकबुद्धीमुळे आपणांस यागोष्टीची पारख होते की, परमात्मा सत्य असून, ज्या महात्म्याने त्या सत्याशी संपर्क केला, त्या सत्याशी ते संलग्न झाले आणि ते सत्य स्वरूपी झाले.

कबीर साहेब सांगतात, ''पूर्ण महात्म्यांची संगत एखाद्या नावेप्रमाणे काम करते. जे जीव महात्म्यांच्या शब्दरूपी नांवेमध्ये आरूढ होतात, ते या भवसागरापार जातात. परमात्म्यास भेटण्याचा आणि त्याचे ज्ञान प्राप्त करण्याचा इतर कोणताही उपाय नाही.'' कबीर साहेब सांगतात:

कथा कीर्तन कल विखे भवसागर की नाव।
कहे कबीर जग तरन को नाही और उपाव।।

मैं तो आन पड़ी चोरन के नगर, सतसंग बिना जीय तरसे।।

प्रभु परमात्म्यासमोर आत्मा विनवणी करीत आहे, ''हे प्रभु! मी चोरांच्या नगरीत आलो आहे. मला तुझी संगत–सोबत मिळत नाही.'' स्वामीजी महाराजांनी सांगितले होते की, सत्संग दोन प्रकारचे आहेत. पहिला परिपूर्ण महात्मे करीत असलेला बाह्य सत्संग आहे तर दुसरा आपण जेव्हा अंतरामध्ये जाऊन शब्दाशी एकरूप होतो तो आंतरिक सत्संग आहे.

हे शरीर एक नगर आहे. काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार हे पाच चोर आहेत. हे चोर आत्म्याकडून ऊर्जा घेऊन आत्म्यासच शक्तीहीन करत आहेत. कबीर साहेब सांगतात:

मुसाफिर जागते रहना नगर में चोर आते हैं।
जरा सी नींद गफलत में देखकर झटपट गठरी उठाते हैं।।

आपण आरामात झोपलेलो असतो, परंतु जेव्हा काम अंतरात रस्सी हलवतो, त्यावेळेस आपण जागृत होतो. आपण असा विचार करीत नाही की आपण आपली कमाई गमावत आहोत. आपणांस वाटते कदाचित आपण आनंद घेत आहोत. आपण आनंद न घेता आपली पारमार्थिक पुंजी गमावत असतो.

जेव्हा अंतरामध्ये लोभाचे धक्के जोर–जोरामध्ये उमटू लागतात, तेव्हा आपण आपली शांती भंग करून घेतो. थोडेफार प्रयत्न करून आपणांस माया मिळत नाही, तेव्हा तिच्या प्राप्तीसाठी आपण चोरी, फसवेगिरी, छल–कपट करू लागतो.

जो मनुष्य या पाच चोरांच्या तावडीत सापडलेला असतो, त्याची सत्संगास जाण्याची इच्छा असूनही त्यासाठी तो वेळ काढू शकत नाही. आई–वडिलांपासून लहान मुलांना कितीही दूर नेले, तरी आई–वडिलांच्या अंतरामध्ये मुलांप्रती असलेल्या ममतेमुळे ते मुलांच्या भेटीसाठी तळमळत असतात. आत्मा परमात्म्याचा अंश आहे व त्यामुळे अंशाचे अंशावर प्रेम असते. म्हणूनच आत्म्यास नेहमी परमात्म्याची ओढ असते.

इस सतसंग में लाभ बहुत है तुरत मिलावै गुर से ।।

आपण प्रेमाने सांगत आहात, ''या सत्संगाचे अनेक फायदे आहेत, त्या सर्व फायद्यांचे वर्णन केले जाऊ शकत नाही. परिपूर्ण महात्म्यांच्या संगत–सोबतीने आपल्या अंतरामध्ये गुरूप्रेम जागृत होते. संगतमध्ये आल्याने वाईट संस्कार दबून जातात आणि चांगले संस्कार जागृत होतात.''

प्रेमी आत्म्याचे सत्संगावर असे प्रेम जडते जसे माशाचे पाण्यावर प्रेम असते. माशास पाण्याबाहेर काढताक्षणीच तो तडफडून मरतो. त्याचप्रमाणे प्रेमी आत्मा अन्नावाचून जिवंत राहतो, परंतु सत्संगाशिवाय मात्र राहू शकत नाही. आपण सर्वजण सत्संगामध्ये येतो. परंतु अनेक प्रेमी सत्संगामध्ये झोपी जातात किंवा गप्पा मारू लागतात वा सत्संगामध्ये रस न आल्याने तेथून निघून जातात.

मूरख जन कोइ सार न जानै, सतसंग में अमृत बरसे।।

आपण मूर्ख, मुढ़ आणि अज्ञानी असतो. परमात्मा सत्संगाद्वारे संतांच्या मुखातून अमृतवर्षाव करीत असतो. भाग्यशाली जीव त्या अमृताचे प्राशन करतात. महात्म्यांचे अनमोल वचन परमात्म्याच्या प्रेमाने ओथंबलेले असतात. भाग्यशाली जीवांवर त्यांचा परिणाम होतो. पापांच्या भाराखाली दबलेले मूर्ख लोक महात्म्यांच्या वचनांची कदर करीत नाहीत, ते त्या अमृत रसास प्राप्त करू शकत नाहीत.

भाई मर्दाना गुरू नानकदेवजींचा अतिशय प्रिय शिष्य होता. तो त्यांच्या सोबत प्रत्येक प्रवासात, प्रत्येक प्रसंगी असे. एके दिवशी गुरू नानकदेवजींनी कृपा करून मर्दानाची सुरत आंतरिक मंडळांमध्ये घेऊन गेले. तेथील अमृताचे ओहोळ पाहून मर्दाना प्रेमात सद्‌गदीत झाला. त्याने गुरू नानकदेवजींना विचारले,''महाराजजी! हे ओहोळ वाहत-वाहत कोठे जात आहेत?'' गुरू नानकदेवजी म्हणाले, ''हे बघ बंधु! हे अमृत आहे. मृत्युलोकामध्ये परमात्म्याने पाठविलेले महात्मे सत्संग करतात. हे अमृत त्यांच्या जिव्हेवर पडत आहे. ते महात्मे या अमृताचा वर्षाव संगतमध्ये करीत असतात. तेथील भाग्यशाली जीव महात्म्यांच्या वचनांना आपल्या हृदयात स्थानापन्न करून घेतात. ते या महात्म्यांच्या वचनांना करोडो रुपयांच्या मूल्यासमान मानतात व शांती प्राप्त करून ते स्वगृही म्हणजे सच्चखंडात जातात.'' गुरू रामदासजी सांगतात:

गुरु अमृत भिन्नी दयोहरी, अमृत गुरु के राम राजे।।

संतांचा देह अमृताने भरलेल्या घागरीसमान असतो. ज्याप्रमाणे आपण कारंज्याद्वारे झाडा-झुडपांवर पाण्याचा वर्षाव करतो, त्याचप्रमाणे संत अमृताचा वर्षाव संगतवर करीत असतात:

शब्द सा हीरा पटक हाथ से, मुट्ठी भरी कंकर से।।

संत-महात्मा सत्संगाद्वारे आपणांस 'शब्द-नामाचे' फायदे सांगतात. परंतु आपण शब्द-नामाची कमाई करीत नाही. विषय-विकारांमध्ये रममाण होतो. विषय-विकार दगड-खड्यांप्रमाणे असून आपण ते दगड-खडे आपल्या मुठीत जमा करीत आहोत. आपण सत्संगही ऐकतो, रोजनिशीही लिहितो, परंतु दुष्कृत्ये करणे, काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार या पाच दरोडेखोरांची साथ सोडण्यास मात्र राजी नसतो. राजस्थानची ही म्हण आपल्यावर पक्की लागू होते:

पंचायत आई सिर मत्थे, परनाला ओये ही।

कहैं कबीर सुनो भाई साधो, सुरत करो वहि घर से।।

कबीर साहेब सांगत आहेत,''प्रियजनहो! सत्संग ऐकत-ऐकत तुम्हांस खूप दिवस लोटले, आता तरी तुम्ही तुमचा कल अंतर्यामात जाण्यावर करावा. थोडेफार अवगुण आपल्यात असतात. एका सत्ससंगात एक अवगुण सोडला व दुसऱ्या सत्संगात दुसरा असे करत करत काही दिवसांमध्येच नामस्मरणाद्वारे आपण आपले तन आणि मन पवित्र करू शकतो.''

जिनकी लगन गुरु सों नाहीं, जिनकी लगन गुरु सों नाहीं।।

कबीर साहेब आपणांस अतिशय प्रेमाने समजावत आहेत की, आपणांस सत्संगामध्ये जाऊनच जाणीव होते की, आपण आपली जमा पुंजी उधळत आहोत, अतिशय नुकसानीचे काम आपण करत आहोत. आपल्या जीवनामध्ये एक-एक श्वास करोडो रुपये मूल्य देऊनही आपण मिळवू शकत नाही. परंतु दैनंदिन जीवनामध्ये आपण दररोज चोवीस हजार श्वास असेच वाया घालवित असतो. आपल्या प्रत्येक श्वासाचा हिशोब केला जातो.

स्वामीजी महाराज सांगत असत जो दगड पाण्यात पडून असला तर तो कमीत कमी उष्णतेपासून तर बचावलेला असतो, मग भलेही त्यामध्ये पाणी झिरपत नसेल. त्याचप्रमाणे जे अतिशय भाग्यवान जीव आहेत, त्यांना परमात्मा अंतरातून प्रेरणा देतो व ते महात्म्याच्या संगत-सोबतीमध्ये जातात. हळूहळू ते देखील आपल्या मनाची समजूत घालून, दुष्कृत्ये-पापांचा त्याग करतात व शब्द-नामाची कमाई करू लागतात. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

जह गुरु तह सतसंग बनाई।।

संगत गुरू बनवू शकत नाही. सतगुरू जेव्हाही या जगात येतात, तेव्हा ते स्वत: संगत बनवितात. महाराज कृपाल सिंहजी सांगत असत, ''परमार्थ एखाद्या संसर्गजन्य रोगाप्रमाणे आहे. जेव्हा एखाद्यास खरूज होते तेव्हा त्याची संगत करणाऱ्यास देखील खाज येऊ लागते.'' त्याचप्रमाणे संत-

महात्म्यांचे परमात्म्यावर प्रेम असते. अशा प्रियजनांना परमात्मा जगात पाठवितो. ज्या जीवांची वेळ झालेली असते, त्या जीवांना संत 'शब्द–नाम' देतात, सत्संगाद्वारे त्यांना समजावतात की प्रिय मुलांनो! हा देश तुमचा नाही, ही जात तुमची नाही. तुमचा देश सच्चखंड असून सतनाम तुमची जात आहे. या परक्या देशामध्ये तुम्ही विनाकारण भटकत आहात. आपण जेव्हा महात्म्यांचा हा संदेश ऐकतो, तेव्हा आपणही त्यामार्गी लागतो.

संत–महात्मा आपल्याप्रमाणे कर्मांचे कैदी नसतात ते कर्म भोगण्यासाठी आलेले नसतात. त्यांना परमात्म्याने या जगामध्ये पाठविलेले असते. त्यांना याजगात येण्याचा आनंदही वाटत नाही व येथून जाण्याचे दु:खही वाटत नाही. महाराज कृपाल सांगत असत, ''जेलमध्ये अपराधी त्याने केलेल्या गुन्ह्यांची सजा भोगण्यासाठी जातो, परंतु तेथे डॉक्टर त्या अपराध्यावर उपचार करण्यासाठी जातो.'' स्वामीजी महाराज सांगतात :

बहुत उठावे जीवन भार।

महात्मा या जगामध्ये मौज–मस्ती करण्यासाठी येत नाहीत. आपण भटकलेल्या जीवांनी केलेल्या कुकर्मांची परतफेड करविण्यासाठी ते या जगात येतात. ते आपणांस नामाची कमाई करण्यात उद्युक्त करवून आपल्या कुकर्मांचे ओझे हलके करतात. ज्या कर्मांचे ओझे आपण हलके करू शकत नाही त्या कर्मांची ते आपणांस माफी देतात तर काही कर्मं स्वत:वर घेऊन ते त्यांची परतफेड करतात.

मी महाराज सावन सिंहजींचा एक प्रसंग सांगत असतो की त्यांना एकदा खूप ताप आला. एका प्रेमीने त्यांना विचारले की,''संताची ही अवस्था? संतांना एवढा ताप? हे तुमचे स्वत:चे कर्म आहे का?'' महाराज सावन सिंहजींनी हसून उत्तर दिले, ''माझ्या एका प्रिय शिष्याचे हे कर्म आहे.'' ज्याने त्यांना प्रश्न विचारला होता, त्याच प्रेमीचे ते कर्म होते ज्याचा भार त्यांनी स्वत:वर घेतला होता.

मी माझ्या जीवनातील एक प्रसंग सांगतो की, एकदा महाराज कृपाल गंगानगरला येणार होते. त्यांनी पुढे पाठवलेले काही प्रेमी कार्यक्रमाच्या एक दिवसापूर्वी माझ्याकडे आले. त्यावेळी मला खूप ताप आला होता. त्यांनी तत्काळ गंगानगरला जाऊन माझ्या तापाबद्दल महाराज कृपालजींना तार पाठविली. कोणत्याही औषधोपचाराशिवाय मी बरा झालो परंतु महाराज कृपालजींना खूपच तीव्र ताप आला. दुसऱ्या दिवशी संगत महाराज कृपालजींच्या येण्याची वाट पाहत होती. मी त्यांना म्हटले,''आता महाराजजी येणार नाहीत. तुम्ही त्यांना तार पाठवून खूप मोठी चूक केली आहे. महाराजजींनी माझ्या कर्मांचे ओझे स्वत:वर घेतले आहे.'' महाराज कृपाल तेथे दोन दिवस उशिरा आले. ते आले तेव्हा त्यांचा चेहरा अतिशय पिवळा पडलेला होता.

माझ्यासमोर घडलेली एक घटना आहे. महाराज सावन सिंहजींच्या दरबारात एक प्रेमी आला. त्याने स्वत:च्या चेहऱ्यावर काजळी फासली होती. तो म्हणाला,''माझ्या हातून पाप घडले असून तुम्ही मला माफ करा.'' त्यावेळी तेथे संगत बसलेली होती. महाराजजींनी विचारले, ''बंधुंनो! याच्या कर्माचा भार स्वत:वर घेण्यासाठी कोणी तयार आहे का?'' आता कोण काय बोलणार? स्वत:च्या कर्मांचे ओझेच आपण उचलू शकत नाही. महाराजजींनी त्यास हेदेखील विचारले नाही की, तू काय पाप केले आहेस? ते म्हणाले, ''ठिक आहे तू बस! माफी देणारा अंतर्यातच बसलेला आहे.''

कबीर साहेब सांगतात,''जो महात्मा सुखांचा देश सोडून, स्वत: आजारांचे शरीर धारण करून आपल्याबद्दल खरी-खुरी सहानुभूती बाळगतो, आपल्या प्रत्येक सुख-दु:खामध्ये सहभागी व सहाय्यक होतो, अशा महात्म्यावर जर आपण निव्वळ देखाव्याचे प्रेम केले तर ती आपली केवढी मोठी चूक ठरेल?''

ते नर खर कूकर सम जग मे, बिरथा जन्म गँवाईं ।।

कबीर साहेब अतिशय कठोर शब्दांमध्ये म्हणतात की, जो मनुष्य परमात्म्याची भक्ती करीत नाही, तो कुत्र्यासमान वा गाढवासमान आहे. परमात्म्याने आपणांस मनुष्य-जन्म त्याची भक्ती करण्यासाठी दिलेला

आहे. तसेच त्याने कृपा करून आपली सतगुरूंशी गाठदेखील घालून दिली आहे. तरीही आपण आपला जन्म व्यर्थ घालवित आहात.

अमृत छोड़ि विषय रस पीवैं, धृग–धृग तिन के ताईं ।।

गुरूप्रेम, गुरूभक्ती अमृत आहे. परंतु असा मनुष्य अमृत सोडून विषय–विकारांचा रस प्राशन करीत आहे.

हरी बेल की कोरी तुमड़िया, सब तीरथ करि आई।।
जगन्नाथ के दरसन करके, अजहुँ न गई कडुवाई।।

त्यांची अवस्था अशी आहे की ज्याप्रमाणे बेलाचे फळ असते. बेलफळ कडू असते. भलेही अडुसष्ठ तिर्थांवर नेऊन त्या फळास स्नान घातले, त्यास जगन्नाथाच्या मंदिरामध्येही नेऊन आणले, तरीही त्याचा कडवटपणा काही कमी होत नाही.

जैसे फल उजाड़ को लागो, बिन स्वारथ झरि जाई ।।
कहैं कबीर बिन बचन गुरु के, अन्त काल पछिताई ।।

ज्याप्रमाणे सुकलेल्या वृक्षांना फळे लागलेली असतात, परंतु त्यांच्यावर हक्क सांगणारा कोणीच नसतो. त्यामुळे ती फळे अशीच गळून पडून वाया जातात. कबीर साहेब एक सल्ला देत आहेत की, ज्यांनी त्यांच्या प्रिय गुरूंच्या वचनांवर अमल केले नाही, त्यांना अंतसमयी पस्तवावे लागेल की मी माझे जीवन विषय–विकारांमध्ये व्यर्थ घालविले. माझ्या गुरूंनी सांगितल्यानुसार माझे जीवन घडविले नाही.

आपले प्रिय सतगुरू आपल्यावर खूप कृपा करून, दूरचा प्रवास करून, ठिकठिकाणी जाऊन आपल्या अंतरात गुरूप्रेम जागृत करतात, सत्संगाद्वारे आपल्या अंतरात विरह निर्माण करतात, परंतु आपण जर अशा महात्म्यांच्या वचनांचे पालन केले नाही तर अंतसमयी आपणांस पस्तवावे लागेल.

***



गुरूंप्रती खरे समर्पण

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे
संतबानी आश्रम, १६ पी एस, राजस्थान – २ मार्च १९८८

एक प्रेमी: *गुरूंच्या अंतरात वसत असलेल्या परमात्म्याप्रती खऱ्या समर्पणा विषयी म्हणजे याजगातील संसारी जीवन जगत असताना गुरूंप्रती स्वत:स समर्पित करण्याविषयी शिष्याचे वर्तन कसे असावे याविषयी आपण दोन शब्द सांगाल का?*

बाबाजी: बंधुंनो! विचारलेला प्रश्न खूप चांगला आहे. परंतु आपण दररोज सत्संगही ऐकतो व संत–महात्म्यांनी केलेले लिखाणदेखील वाचतो. या बाबतीत संतांनी बरेच काही सांगितलेले आहे. या जगात येऊन ते स्वत: आदर्श जीवन जगतात आणि आपल्या समोर त्यांचा आदर्श ठेवतात. असे करून ते आपणांस प्रेरणा देतात की तुम्ही जर असे जीवन जगलात, गृहस्थी जीवन व्यतीत करीत असता ध्यान–अभ्यास केलात, स्वत:च्या विचारांना पवित्र केलेत तर समाज बदलण्याची गरजच नाही, कोणतेही विशिष्ट प्रकारचे वस्त्र परिधान करण्याची गरज नाही. प्रश्न तर प्राधान्य ध्यान–अभ्यासास देण्याचा, गुरूंवर प्रेम करण्याचा व त्यांच्या आज्ञेचे पालन करण्याचा आहे.

गुरू नानकदेवजींच्या वाणीवर काल सत्संग केला होता. त्यामध्ये तुम्ही गुरू अंगददेवजींचा इतिहास ऐकला की कशाप्रकारे त्यांनी या जगातील स्वत:च्या जबाबदाऱ्या पूर्ण करीत, स्वत:च्या गुरूंची सेवा करीत, त्यांच्या आदेशांचे पालन करीत, स्वत:चे जीवन पवित्र करीत त्यांनी स्वत:स गुरूंच्या शरीराचा एक भाग बनविला, त्यांना स्वत:वर प्रसन्न करून घेतले. स्वामीजी महाराजांनी म्हटले आहे:

जब जीव शरण गुरु की आवे, कर्म धर्म सब दे नसावे।
जो मार्ग गुरु दे बताई सोई कर्म–धर्म हुआ भाई।।

स्वामीजी महाराज सांगतात,''शिष्य सतगुरूंकडे येण्याअगोदर जे काही जप–तप करीत असतो, कर्मकांडे करीत असतो, त्यांचा त्याने त्याग सतगुरुंना शरण आल्यावर करणे आवश्यक आहे. त्यास सतगुरू जो मार्ग देतात, तो मार्गच त्याचा धर्म व्हावयास हवा. शिष्याने अंत:करणापासून गुरू–भक्तीवर कायम राहणे गरजेचे असते.''

मी अनेकदा सांगितले आहे,''सतगुरूंच्या चरणी जाण्यापूर्वी तुम्ही हवी तेवढी चौकशी करा, त्यांचे जीवन चरित्र वाचून खात्री करा की त्यांनी ध्यान–अभ्यास केलेला आहे किंवा नाही. परंतु एकदा सतगुरूंचा अंगिकार करून त्यांच्याकडून नाम प्राप्त केल्यानंतर ते तुम्हांस जे काही सांगतील त्यानुसार करणे आवश्यक आहे, तुम्ही इतरत्र विचलीत होता कामा नये. जो मार्ग त्यांनी सांगितला आहे, त्यावर तुम्ही ठाम असावयास हवे.''

महाराज सावन सिंहजींनी सैन्यामध्ये नोकरी केली. त्यांनी या जगातील इतर अनेक जबाबदाऱ्या निभावल्या. परंतु त्यांनी ध्यान–अभ्यास, सतगुरूप्रेम आणि गुरूंनी दर्शवलेल्या मार्गावर चालण्यास व गुरूंच्या आज्ञेचे पालन करण्यास अधिकाधिक प्राधान्य दिले. आपल्यात हीच कमतरता आहे की गुरू प्रेमास जो अग्रक्रम द्यावयास हवा तो आपण देत नाही. आपण जगास आपले सर्वस्व मानतो. मनाच्या आदेशाचे पालन करतो. तो तोडण्यास आपण राजी नसतो. गुरूंच्या आदेशाचे पालन करण्यास आपण तयार नसतो.

कबीर साहेबांचा एक शिष्य होता. नामदान घेऊनही तो इतरत्र भरकटत राहिला. परंतु जेव्हा त्याच्यावर संकटे आली तेव्हा तो रूदन करू लागला, सतगुरूंना आठवण करू लागला व त्यांच्याकडे गेला. तेव्हा कबीर साहेब त्यास म्हणाले की, तू इतरत्र भरकटत तुझ्या आत्म्यास का त्रास देत राहिलास? मी सांगितल्याप्रमाणे नामाच्या रसाचे प्राशन केले असतेस तर तू या अडचणींना सामोरे जावे लागले नसते. तरीदेखील संत कृपाळू असतात. ते शिष्यांची योग्य तेवढी मदत करण्यास कधीच कचरत नाहीत.

महाराज कृपाल नेहमी लैला–मजनू यांच्या प्रेमाचे उदाहरण देत असत की जरी त्यांचे प्रेम सांसारिक होते त्यांच्या प्रेमात विषय–विकार नव्हते. त्यांचे प्रेम अतिशय निर्मळ व पवित्र होते. लोकांद्वारे त्या प्रेम करणाऱ्यांच्या गोष्टी ऐकल्यावर एका राजकुमाराच्या मनात कुतूहल निर्माण झाले की जो मजनू लैलाच्या प्रेमात सुकून कृश झाला आपण यांना जरूर भेटावे. तो राजकुमार जेव्हा मजनूस भेटण्यासाठी गेला, तेव्हा एका व्यक्तीने मजनूस म्हटले की तुला एक राजकुमार भेटू इच्छितो. त्यावर मजनू म्हणाला,''मी त्यास भेटण्यासाठी तयार आहे, परंतु त्याने माझ्यासमोर लैलाच्या रूपात यावे.'' काय आपल्या अंतरामध्ये सतगुरूंप्रती एवढे प्रेम आहे?

सतगुरूंनी देहत्याग केल्यानंतर अनेकदा लोक त्यांच्या आश्रमाचा आणि जमीनजुमल्याचा ताबा मिळविण्यासाठी न्यायालयात जातात. परमसंत गुरू कृपाल असे महान संत होते, ज्यांनी त्यांच्या सतगुरूंच्या आश्रमासाठी भांडणतंटा वा वादविवाद केला नाही. त्या आश्रमामध्ये गुरू कृपालजींनी स्वत:साठी घर तयार केलेले होते, त्या घरासाठी देखील ते तेथे गेले नाहीत. ते घर मी स्वत: पाहिले होते. ते तयार करण्यासाठी बराच खर्च केलेला होता. ते घर तसेच सोडून आले व त्याबद्दल त्यांना जराही खंत नव्हती. ते नेहमी सांगत की मी जे काही केले आहे, ते गुरूंसाठी केले आहे. याला म्हणतात **गुरूंप्रती खरे समर्पण**.

प्रियजनहो! आपण जेव्हा सतगुरूंच्या आदेशास, त्यांनी सांगितलेल्या ध्यान–अभ्यासास अग्रस्थानी ठेवतो, तेव्हाच **आपण स्वत:स गुरूंना समर्पित करू शकतो**. त्यावेळी जगास दुय्यम स्थान द्यावे लागते. महाराज कृपाल सांगत असत,''मी नेहमीच माझ्या जीवनात परमात्म्यास अग्रस्थानी ठेवले तर जगास दुय्यम मानले.''

प्रियजनहो! जेव्हा आपण सतगुरूंना आपले सर्वस्व मानतो तेव्हाच सतगुरूंना आपल्या जीवनात प्रमुखस्थानी ठेवतो. मग सर्व जग जरी म्हणू लागले की हे ठीक नाही तरी आपण त्यावर विश्वास ठेवत नाही कारण आपण स्वत:च्या डोळ्यांनी पाहिलेले असते की आपले गुरू परिपूर्ण आहेत. गुरू नानकदेवजी सांगतात:

सतगुरु पूरा भेटेया पूरी होवे जुगत हसेंदयाँ खेलेंदयाँ विच्चे होवे मुक्त।

गुरू नानकदेवजी महाराज सांगतात,''आपणांस पूर्ण सतगुरू लाभलेले आहेत. आपण संसारिक आयुष्य जगत असतानाही ते आपणांस मुक्ती देतात.'' सतगुरू आपणांस समाज बदलण्यास सांगत नाहीत. ते कधीच आपणांस आपल्या परिवारापासून वा समाजपासून दुरावत नाहीत.

वास्तविकत: आपणच आपल्या जबाबदाऱ्या निभावण्यास नाकारतो. तरीही ते आपणांस सांगतात की तुम्ही ज्या स्वत: या जगातील जबाबदाऱ्या स्वीकारलेल्या आहेत त्या पूर्ण करणे तुमचे कर्तव्य आहे. परंतु ही कर्तव्यपूर्ती करीत असता आपण जगास आणि प्रापंचीक कामांना प्राधान्य देतो, विषय-विकारांपासून स्वत:च्या मनास आवरत नाही, मग आपल्या अंतरात गुरूप्रेम कसे जागृत होईल? कारण विषय-विकारांच्या दलदलीखाली गुरूप्रेम दबून जाते. हुजूर सावन सिंहजी महाराज नेहमी एक पंजाबी म्हण सांगत असत:

हत्थ कार वन्नी, दिल यार वन्नी।

आपले हात कामात मग्न असावेत परंतु हृदयात प्रिय गुरूंची आठवण असावी. आपल्यापैकी असे किती प्रेमी आहेत जे या जगातील कामे करीत असताना देखील आपल्या डोळ्यांसमोर मनमोहक गुरू स्वरूप प्रतित करतो, गुरूंचे स्मरण करतो? ध्यान-अभ्यास करताना मात्र गुरूंचे स्मरण विसरून आपण सांसारिक गोष्टींचा व कामाचा विचार करतो, परंतु सांसारिक कामे करताना आपण गुरू-स्वरूप व गुरूंनी दिलेले नामस्मरण विसरून जातो.

कबीर साहेबांचा धर्मदास नावाचा शिष्य होता. अनुराग सागर पुस्तकात कबीर साहेब आणि धर्मदास यांच्यामधील प्रश्नोत्तर रूपात झालेले संभाषण आपण वाचतो. धर्मदास हिंदुस्थानातील सर्वांत श्रीमंत मनुष्य होता. त्यावेळी चलनाचे खूप मुल्य होते. त्याकाळी तो चौदा करोड रुपयांचा मालक होता. त्यास धनी धर्मदास असे संबोधले जाई. तुम्ही विचार करा की ज्याच्याकडे एवढी संपत्ती असेल, त्याच्या किती जबाबदाऱ्या असतील? त्याचे किती धंदे असतील? परंतु धर्मदासाने कबीर साहेबांद्वारे नाम घेऊन जेव्हा ध्यान-अभ्यास केला व अंतरामध्ये गेला तेव्हा तो म्हणाला:



सुपने इच्छा न उठे गुरु आन तुम्हारी हो।

हे सतगुरू! मी तुमची शपथ घेऊन सांगतो की मला आता या जगात कोणत्याही प्रकारचे काम करण्याची इच्छा राहिलेली नाही. स्वप्नामध्ये देखील तुमच्या भेटीशिवाय माझ्या अंतरामध्ये इतर कोणतीही अभिलाषा निर्माण होत नाही. खरा शिष्य इतर कोणत्याही प्रकारचे नुकसान सहन करण्यास राजी असतो, परंतु स्वत:च्या सतगुरूंची शपथ तो कधीच घेत नाही, कारण त्यास कल्पना असते की माझे गुरू परमात्मारुप आहेत.

आपण जागृत अवस्थेमध्ये तसेच संसारिक कामे करीत असताना जर आपल्यासमोर गुरूंचे सुंदर, मनमोहक स्वरूप ठेवले, त्यांनी दिलेले नामस्मरण सातत्याने आपण करीत राहिलो तर निद्रावस्थेत आपणांस सतगुरूंचे दर्शन होणार नाही का? ते रात्री स्वप्नात आपणांस नक्कीच भेटतील. जागेपणी जे विचार आपल्यासमोर असतात, तेच विचार आपणांस झोपल्यानंतर येतात.

प्रियजनहो! जीवांना अडकविण्यासाठी काळाने या जगामध्ये निरनिराळ्या प्रकारचे फास टाकलेले आहेत. संत–महात्मे देखील या जगातील कोणतीही एखादी अशी जागा सांगू शकत नाहीत वा त्याबद्दलचे उदाहरण देऊ शकत नाहीत, जेथे या सांसारिक कामातून तुमची सुटका होईल, जेथे आपणांस सतगुरूंचे पवित्र प्रेम लाभू शकेल. संत–महात्म्यांचा स्वानुभव असतो. ते आपणांस सांगतात तुम्ही अंतरामध्ये जा. हे स्थूल शरीर विसरून आपल्या आत्म्यावरील स्थूल, सूक्ष्म व कारण ही आवरणे दूर करीत पारब्रह्मामध्ये पोहचा, जेथे प्रेमाच्या प्रदेशाची सुरूवात होते. तेथे लिंगभेद नाही. तेथे पोहोचल्यावर तुमच्या लक्षात येईल कशा रितीने तुम्ही संसारिक जबाबदाऱ्या पूर्ण करीत सतगुरूंचे आभार मानू शकता?

महाराज सावन सिंहजी या बाबतीत एक गोष्ट सांगत असत,''एकदा एक घोडेस्वार घोड्यावर बसून जात होता. वाटेत घोड्यास तहान लागली तेव्हा त्यास आपल्या घोड्याला थोडे पाणी पाजायचे होते. वाटेत एक शेतकरी विहीरीतून रहाटाच्या मदतीने आपल्या शेताला पाणी देत होता. घोडेस्वाराने शेतकऱ्यास विनंती केली की मला आपल्या घोड्यास पाणी पाजायचे आहे.

शेतकऱ्याने त्यास म्हटले की तू तुझ्या घोड्यास या बाजूस आण जिथून रहाटाचे पाणी निघत होते. रहाट चालू असताना एक विशिष्ट प्रकारचा आवाज येतो. पाणी पिण्यासाठी त्याने घोड्यास पुढे नेले असता तो आवाज ऐकून पाणी पिण्याऐवजी घोडा घाबरून मागे सरकला. त्या घोडेस्वाराने रहाट थांबविण्यास सांगितले. परंतु तो रहाट थांबविल्यानंतर पाटामध्ये पडणारे पाणी क्षणभरातच वाहून जात असे. पाटामध्ये पाण्याचा संचय झाला तरच तो घोडा पाणी पिऊ शकणार होता. त्यासाठी शेतकऱ्याने पुन्हा रहाट सुरू केल्यावर त्यामुळे होणाऱ्या आवाजाने घोडा पुन्हा घाबरून मागे हटला. असे अनेकदा घडले. शेतकऱ्यास याचा अनुभव असल्याने तो घोडेस्वारास म्हणाला की,''रहाटाच्या आवाजातच यास पाणी प्यावे लागेल.''

महाराज सावन सांगत असत की,''त्या घोड्याप्रमाणेच या जगातील जबाबदाऱ्या पूर्ण करीत असतानाच तुम्हास ध्यान–अभ्यास करावा लागेल. तुम्हाला प्राधान्य मात्र सतगुरू प्रेमास, त्यांनी दिलेल्या नामास द्यावे लागेल.'' गुरू नानकदेवजी सांगतात, ''सत्संगी व गुरूमुख लोकांचे जीवन अशाप्रकारचे असते की ते जगाशी संभाषण करीत असतात, येथील कामेदेखील करीत असतात, परंतु त्यांचे हृदय मात्र त्यांच्या प्रभुरुप सतगुरूंशी एकरंग झालेले असते.'' एका भजनामध्ये तुम्हांस सांगितले आहे:

अजायब दी पुकार है, खड़क रही तार है।

प्रियजनहो, हृदयाची तार वाजणे म्हणजे सतगुरूंवर तुमचे लक्ष केंद्रीत व्हावयास हवे, जिव्हेवर त्यांनी दिलेले नाम हवे, हृदयात व नजरेसमोर त्यांचे मनमोहक स्वरूप सामावलेले असावे.

महात्मा सांगतात,आपल्या प्रिय गुरूंच्या दर्शनासाठी लाखो लोक स्वत:चे घर–दार त्यागून जंगलामध्ये जातात. वाळलेल्या हरड वनस्पतीप्रमाणे त्यांचे शरीर सुकून कृश बनते. परंतु हे सर्व काही करूनही त्यांना परमात्मा प्राप्त होत नाही व त्यांचा काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार देखील घटत नाही. अखेरीस निराश होऊन ते पुन्हा आपल्या स्वगृही परततात. प्रपंचात परतल्यावर पुन्हा पूर्वीप्रमाणे काम–क्रोधात तसेच लोभ–मोह–अहंकारात लिप्त रहातात. त्यामुळे समाजातील इतर लोकही त्यांच्यावर हसतात की हा इतकी वर्षे साधू बनून राहिला परंतु हा तसाच आहे.

संत–महात्मा आपणांस कधीच घर–दाराचा त्याग करण्यास, जग–रहाटी सोडण्यास सांगतात. ते आपणांस सांगतात की दररोज पहाटे उठून दोन–तीन तास ध्यान–अभ्यास करा, स्वत:चे जीवन निर्मळ–पवित्र करा. योग्य मार्गाने स्वमेहनतीने धन कमवून स्वत:चा उदरनिर्वाह करा. तसे केल्याने गृहस्थी जीवन जगतही तुम्ही मुक्ती मिळवू शकता.

माझ्या आयुष्यातील अतिशय रोचक घटना आहे. मी सैन्यामध्ये नोकरीस असताना, एकदा दोन दिवसांच्या सुट्टीवर घरी आलो. माझ्या सोबत आणखीन तीन-चार साथीदारही होते. आमचे येणे-जाणे एकाच ट्रेनने होणार होते. आमची ट्रेन सुटण्याची वेळ दुपारी बारा वाजताची होती. परंतु आम्ही घरुन दुपारी दीड वाजता स्टेशनवर निघालो. सहाजिकच ट्रेन निघून गेलेली होती. त्यामुळे ड्युटीवर रुजू होण्यास आम्हाला उशीर झाला. सैन्यात नियम अतिशय कडक असतात. आम्हांस सांगितले गेले की उशीरा येण्याचे स्पष्टीकरण देण्यासाठी तुम्हांस अधिकाऱ्यांसमोर उभे राहावे लागेल. आमच्या चौघांचीही ही पहिलीच चुकी होती. साधारणपणे पहिली चुकी माफ केली जाते.

आमच्या अधिकाऱ्याने आम्हांस बोलावले आणि विचारले, ''तुम्हाला उशीर का झाला? तुम्ही त्याबद्दल पुर्वसूचना वा तार का केली नाही?'' इतर सर्वांनी हेच उत्तर दिले की आमची ट्रेन चुकली. सर्वात शेवटी माझा नंबर होता. इतरांची उत्तरे ऐकून तो अधिकारी माझ्याकडे आला आणि मला हसून त्याने विचारले की तुझे काय उत्तर आहे? मला वाटले सत्यच सांगावे म्हणून मी उत्तर दिले, ''ट्रेन बरोबर वेळेवर आली होती. परंतु आम्हालाच स्टेशनवर येताना उशीर झाला. त्यामुळे तुम्ही द्याल ती शिक्षा भोगण्यास आम्ही तयार आहोत.'' मी प्रामाणिकपणे दिलेले खरे उत्तर ऐकून आमचा अधिकारी प्रसन्न झाला व आम्हा सर्वांना त्याने माफी देत म्हटले यापुढे देखील सदैव सत्यच बोला.

माझ्या अंत:करणावर या घटनेचा परिणाम झाला. मी विचार केला की क्षुल्लक एक तासाचा आराम करण्यासाठी आम्हांस अधिकाऱ्यासमोर उभे राहावे लागले. तेथेही सर्वांचे मन घाबरून सत्य सांगण्यास राजी नव्हते. ट्रेन येण्याच्या एक तास आधी मी स्टेशनवर का पोहोचलो नाही?

सतगुरूंनी आपणांस करावयास सांगितलेल्या ध्यान-अभ्यासाचा कधी आपण एवढ्या गांभिर्याने विचार केला आहे का? अनेक प्रेमी कित्येक दिवस,



कित्येक महिने ध्यान–अभ्यासात बसत नाहीत, रोजनिशी लिहित नाहीत आणि रोजनिशी लिहिली तरी एकच चूक वारंवार करीत असतात. कधी आपण हा विचार केला आहे की या जगातील अधिकाऱ्याची आपण किती भिती बाळगतो, काय आपण आपल्या सतगुरूंना त्या अधिकाऱ्यासमान देखील समजत नाही? इतके दिवस, इतके महिने आपणांस नामस्मरणाशिवाय वाया घालविले याचे दु:ख आपणांस होते काय? यावर आपण सतगुरूंना काय उत्तर देऊ? त्यांच्या समोर जाऊन आपण सत्य बोलू शकू का?

मिस्टर ओबेरॉय यांनी एक पुस्तक लिहिले आहे, ज्यामध्ये सुंदरदासच्या गोष्टी नमूद केलेल्या आहेत. सुंदरदासला महाराज सावन सिंहजींच्या चरणी राहण्याची खूप संधी लाभली. बरीच संसारिक कर्मेदेखील त्याने भोगली, ज्यांबद्दल दयाळू सावन सिंहजींनी त्यास अगोदरच पूर्वकल्पना दिली होती.

वीस वर्षे मी आणि सुंदरदास एका घरामध्ये रहात होतो. आम्ही एकत्र जेवायचो, आमचा खूप घनिष्ट स्नेहसंबंध होता. तो सांगत असे, ''आपण एक मिनीट जरी गुरूंना विसरलो तर ते एकवीस मिनिटे गुरूंना विसरल्या समान आहे. एक दिवस आपण ध्यान–अभ्यास केला नाही तर ते एकवीस दिवस ध्यान–अभ्यास न करण्यासमान आहे. एक महिना ध्यान–अभ्यास न केल्यास ते एकवीस महिने न केल्यासमान आहे. त्याचप्रमाणे एक वर्षभर आपण सतगुरूंचे दर्शन न केल्यास ते एकवीस वर्षे न केल्यासमान आहे. इतकी वर्षे आपण या जगात राहू की नाही याची आपणांस कल्पनादेखील नाही.''

आम्ही दोघांनाही ध्यान–अभ्यासास अग्रक्रम दिलेला होता. आम्ही रात्रीच्या वेळी शेतामध्ये शेकोटी पेटवून ध्यान–अभ्यासासाठी आठ–आठ तास बसत असू. एकदा अशाच रितीने बसलो असताना, त्याच्या पायावर एक जळते लाकूड पडले. तुम्ही विचार करून पहा! भाजल्याने किती वेदना होतात, परंतु सुरत जेव्हा अंतरामध्ये एकाग्र होते, तेव्हा सर्व वेदनांचा आपणांस विसर पडतो. आपल्या शरीराची शुद्धही राहत नाही. जळते लाकूड पायावर पडून पाय भाजल्यानंतरही सुंदरदास ध्यान–अभ्यासातून उठल्यानंतर म्हणाला की आज ध्यान–अभ्यास करताना जेवढा आनंद मिळाला, तेवढा आनंद आयुष्यात यापूर्वी कधीच मिळाला नाही. यावरून त्याची सतगुरूंच्या प्रती असलेल्या निष्ठेची कल्पना तुम्हांस येईल.

त्याचा भाजलेला पाय तपासल्यावर डॉक्टरही म्हणाले की पाय कापून टाकावा लागेल. परंतु परमपिता कृपालजींनी पाय कापण्यास मनाई केली. इतर प्रेमींसोबत महाराज कृपाल माझ्या आश्रमामध्ये आले असता त्यांना त्या प्रेमींना म्हटले,''याला म्हणतात ध्यान–अभ्यास. असा सतगुरूंशी लीन होऊन स्वत:च्या शरीराचाही विसर पडलेला तुमच्यापैकी कोणी आहे का?''

अशा रितीने सुंदरदासने आपल्या जीवनातील जबाबदाऱ्यांची पूर्तता करीत सतगुरूंना प्रथमस्थानी ठेवले होते.

प्रियजनहो! आजकाल आपणांस शेती करण्यासाठी ट्रॅक्टर व इतर साधने उपलब्ध आहेत. परंतु मी आणि सुंदरदास शेती करीत असताना आमच्याकडे आधुनिक साधने नव्हती, एक उंट आणि दोन बैल होते. आम्ही दोघे एकत्र शेतकाम करीत होतो. आमच्या आजूबाजूस असलेले लोक आमचे बोलणे चोरून ऐकण्याचा प्रयत्न करीत असत.

आम्ही नेहमीच सतगुरू प्रेमाबद्दल बोलत असू. आमच्या अंतरात सतगुरूंप्रती असलेली आपुलकी, प्रेम पाहून लोक म्हणत, यांना कसलीच काळजी नाही. एकाचे बायको व कुटुंब मृत्यू पावले आहेत तर दुसऱ्याने लग्नच केलेले नाही. त्यावेळी सुंदरदास वयस्कर होता तर मी तरुण होतो.

मी सकाळी उठून स्नान करून चहा बनवित असे. त्यानंतर सुंदरदासला जागे करण्यासाठी हाक देई. तो मात्र नामस्मरणात एकरंग झालेला असे. मी आवाज देई,''सुंदरदास! उठला आहेस का?'' तो उत्तर देई,''होय! मी उठलेलो आहे. परंतु चहा करावयास लागू नये म्हणून पडून राहिलो आहे.'' नंतर उठून चहा पित असताना तुलसी साहेबांच्या हे वाक्य तो उच्चारत असे:

भजन करन को आलसी भोजन को तैयार।
तुलसी ऐसे भक्त को लख वारी धिक्कार।।

असे म्हणून चहा पिऊन तो पुढे आपल्या दिनश्चर्येस सुरवात करी. आम्ही दोघे जण खूप मेहनत करीत असू. तसेच ध्यान-अभ्यास करणे कधीच टाळले नाही. आम्ही तिसऱ्या कोणत्याही व्यक्तीस आमच्या बरोबर राहू दिले नाही. सुंदरदास म्हणत असे:

तीजा रलया ते काम गलया।

आम्हाला वाटत असे की जर तिसरा एखादा मनुष्य आमच्या सोबत राहिला तर तो आमच्या कामात अडचण निर्माण करेल. मी व सुंदरदास रात्र होईपर्यंत आमचे काम पूर्ण करीत असू, सोबत आमचे नामस्मरणही सुरू असे.

कित्येकदा अत्तर विकणारा भलेही अत्तर विकू इच्छित नसेल, परंतु अत्तराच्या बाटलीचे झाकण उघडे राहिल्याने, त्याच्या सुगंधाने आकर्षित

होऊन माणसे त्या अत्तरवाल्याकडे येतातच. याचप्रमाणे अनेकदा लोक मला भेटण्यासाठी माझ्याकडे येत. ते मला संत म्हणत असत.

अनेकदा येऊन लोक मला विचारीत की आम्ही संतांना भेटू इच्छितो. त्यावेळी शेतकाम करत असल्याने माझ्या हातामध्ये शेती–औजारे असत. मी त्यांना म्हणे,''या संत मागून येत आहेत. तोपर्यंत या, आपण बसून गप्पा–गोष्टी करू या.'' बोलता–बोलता त्यांना जाणीव होई की ज्यांना भेटण्यासाठी आपण आलो आहोत, ते संत हेच आहेत.

मी कधीच स्वच्छ कपडे परिधान करून स्वत: संत असल्याचा देखावा केला नाही. खरेतर त्यावेळी मला दोनच शब्दाचे नाम प्राप्त झाले होते. त्यामुळे त्या दोन शब्दांच्या मदतीने ध्यान–अभ्यास करीत असे. सुंदरदासास महाराज सावन सिंहजींद्वारा पाच शब्दांचे पूर्ण नाम प्राप्त झालेले होते.

सांगण्यासाठी खूप काही आहे, परंतु वेळ झालेला आहे. माझी तुम्हाला खास विनंती आहे की ध्यान–अभ्यासाचे जे वेळापत्रक बनविलेले आहे, त्यास अनुसरुनच ध्यान–अभ्यास करावा. मी कित्येकदा सांगूनही अनेक प्रेमी येथे येताना त्यांच्या देशातून ध्यान–अभ्यासाची प्रॅक्टीस करून येत नाहीत व इथे इतरांना दाखविण्यासाठी जास्त ध्यानात बसतात. पुरेशा निद्रेअभावी सत्संगामध्ये बसल्यावर त्यांना निद्रा येते. ते कधी डोळे मिटून बसतात तर कधी डोळे उघडतात. खरेतर असे करू नये. जेवल्यानंतर लगेच ध्यान–अभ्यासात बसू नये, त्यामुळे पक्वाशयावर परिणाम होतो. ज्याप्रमाणे इथे कार्यक्रम ठरलेला आहे त्याचप्रमाणे ध्यान–अभ्यास करा,त्यामुळे व्यवस्थित निद्रा घेतल्यानंतर पहाटे तीन वाजता उठताना तुम्हांला त्रास होणार नाही. अन्यथा ध्यान–अभ्यासास बसताना, सत्संगास बसलो असता झोप येते.

***

धन्य अजायब

परम संत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणीतील
अहमदाबाद शहरातील सत्संगाच्या कार्यक्रमाची माहिती

परमसंत अजायब सिंहजी महाराजांच्या अपार दयेने अहमदाबाद शहरात सत्संगाचा कार्यक्रम निम्नलिखीत दिवशी आयोजित होत आहे. संगतच्या चरणी नम्र विनंती आहे की त्यांनी सत्संगात सहभागी होऊन संतवचनांचा व ध्यान–अभ्यासाचा लाभ घ्यावा.

अहमदाबाद : १ ते ३ जुलै २०१६

ईश्वर भवन, (कॉमर्स कॉलेज जवळ), नवरंगपुरा,
अहमदाबाद (गुजरात)
फोन – ९९९८९ ४६२३१, ९७२५० ०५७९४, ९६३८७ ५२०२०

***